महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १३४ वे | दिनांक : १०/०५/२०२६ | वार : रविवार

## विजय थलपती आज घेऊ शकतात मुख्यमंत्रिपदाची शपथ; १२१ आमदारांच्या पाठिंब्याचा दावा



**चेन्नई :** तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या निकालाच्या सहाव्या दिवशी, अभिनेता विजयसाठी सरकार स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तीन दिवसांच्या विलंबानंतर निवडणुकीत दोन जागा जिंकलेल्या व्हीसीकेने (VCK) विजय यांच्या टीव्हीके (TVK) पक्षाला आपले पाठिंब्याचे पत्र सादर केले आहे.

व्हीसीकेचे अध्यक्ष थोल थिरुमावलवन यांनी टीव्हीके नेते अधव अर्जुन यांना पाठिंब्याचे पत्र सुपूर्द केल्याचा एक फोटोही समोर आला आहे. विजयच्या टीव्हीके पक्षाला यापूर्वी ११६ आमदारांचा पाठिंबा होता. व्हीसीकेचा पाठिंबा मिळाल्यानंतर हा आकडा बहुमताच्या आकड्यापेक्षा एकने वाढून ११९ झाला आहे.

दरम्यान, घोडेबाजाराच्या भीतीमुळे काँग्रेसने आपले पाच आमदार हैदराबादला पाठवले आहेत. पक्षाच्या सूत्रांनुसार, मेलूरचे आमदार पी. विश्वनाथन हे आमदारांच्या या गटाचे नेतृत्व करत आहेत. सूत्रांनी असेही संकेत दिले आहेत की, टीव्हीकेचे सरकार स्थापन झाल्यास पी. विश्वनाथन यांना मंत्री म्हणून नियुक्त केले जाऊ शकते.

२३४-सदस्यीय विधानसभेत टीव्हीकेने १०८ जागा जिंकल्या, त्यापैकी विजय यांनी दोन जागा मिळवल्या. व्हीसीकेच्या आधीच, सरकार स्थापन करण्यासाठी टीव्हीकेने काँग्रेस, सीपीआय आणि सीपीआय(एम) यांचा पाठिंबा मिळवला होता. काँग्रेसचे पाच आमदार आहेत, तर सीपीआय आणि सीपीआय(एम)चे प्रत्येकी दोन आमदार आहेत.

VCK चे प्रमुख थिरुमावलवन यांनी शुक्रवारी सकाळी जाहीरपणे सांगितले की, त्यांचा पक्ष टीव्हीकेला पाठिंबा देईल. तथापि, पाठिंब्याचे औपचारिक पत्र रात्री उशिरापर्यंत राज्यपालांना सादर केले गेले नाही. यामुळे शनिवारी होणाऱ्या विजय यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीला पुन्हा एकदा विलंब झाला.

राज्यपालांच्या कार्यालयातील सूत्रांनुसार, शुक्रवारी संध्याकाळी झालेल्या बैठकीत विजय यांच्यासोबत विक्रमी ११६ आमदार होते.

## ज्येष्ठ कार्यकर्त्या शांताबाई साठे काळाच्या पडद्याआड





**मुंबई :** लोकशाहीर कॉम्रेड अण्णाभाऊ साठे यांच्या कन्या आणि कम्युनिस्ट चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या कॉम्रेड शांताबाई साठे (दोडके) यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. कांदिवली येथील खासगी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्या ९० वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनामुळे अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपणारा एक महत्त्वाचा दुवा तुटल्याची भावना सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातून व्यक्त होत आहे. शांताबाई अविवाहित होत्या. त्यांच्या पश्चात धाकटी बहीण शकुंतला, भाचे, भाची आणि नातवंडे असा परिवार आहे.

शांताबाई या अण्णाभाऊ साठे यांच्या पत्नी कॉम्रेड जयवंताबाई यांच्या कन्या होत्या. लहानपणापासूनच त्यांच्यावर डाव्या विचारसरणीचे संस्कार झाले होते. बालवयातच त्यांनी बाल संघ आणि तत्कालीन लाल बावटा कला पथकात सक्रिय सहभाग घेतला. सांस्कृतिक चळवळीच्या माध्यमातून त्यांनी समाजप्रबोधनाचे काम केले. त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले होते.

१९४९ च्या काळात कम्युनिस्ट पक्षावर मोठ्या प्रमाणावर दडपशाही सुरू असताना शांताबाईंनाही त्याचा फटका बसला होता. त्या काळात त्यांनी काही महिने तुरुंगवास भोगला. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत कठीण असल्याने वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी त्यांनी औषध निर्मिती कंपनीत नोकरी स्वीकारली. नोकरी करत असतानाच त्या कामगार संघटनांच्या कामातही सक्रिय राहिल्या. कामगार चळवळ आणि सामाजिक बांधिलकी यामध्ये त्यांनी आयुष्यभर सातत्य राखले.

शांताबाईंच्या स्वभावात माणुसकी आणि कुटुंबाविषयीचा जिव्हाळा विशेष होता. स्वतःच्या मर्यादित पगारातून त्या दर महिन्याला वाटेगाव येथे अण्णाभाऊ साठे यांच्या पहिल्या पत्नी कोंडाबाईंना आर्थिक मदत पाठवत असत. अण्णाभाऊंच्या पहिल्या कुटुंबाशी, विशेषतः मुलगा मधुकर यांच्याशी त्यांचे अत्यंत आत्मीय संबंध होते. आर्थिक अडचणी असूनही त्यांनी कधीही कुटुंबापासून किंवा सामाजिक जबाबदाऱ्यांपासून स्वतःला दूर ठेवले नाही.

साहित्य आणि रंगभूमीशीही शांताबाईंचे अतूट नाते होते. अण्णाभाऊ साठे यांच्या कथा, कादंबऱ्या आणि लोकनाट्यांच्या त्या पहिल्या वाचक मानल्या जात होत्या. शाहीर अमर शेख आणि शाहीर दत्ता गव्हाणकर यांच्या कलापथकात त्यांनी सक्रिय भूमिका बजावली. सत्तरच्या दशकात 'काय चाललंय गं' या लोकनाट्यात त्यांनी अभिनय केला होता. तसेच १९८६ मध्ये 'लोकमंच' संस्थेच्या गाजलेल्या 'अकलेची गोष्ट' या लोकनाट्यात त्यांनी अभिनयासोबत दिग्दर्शन सहाय्यक म्हणूनही काम पाहिले होते.

## बुरखा, नकाब बाळगणे गुन्हा नाही, हा सुशिक्षित मुस्लिमांना त्रास देण्यासाठी कट - असदुद्दीन ओवेसी



**छत्रपती संभाजीनगर :** नाशिकच्या कथित धर्मांतर प्रकरणातील आरोपी निदा खान हिच्या अटकेनंतर निर्माण झालेल्या वादावर एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आज छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी या प्रकरणातील कायदेशीर त्रुटींवर बोट ठेवले आणि तपास यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. TCS प्रकरणाला MIM पक्षाशी जोडणे चुकीचे आहे. मुस्लीम समाजातील सुशिक्षित मुलामुलींना त्रास देण्यासाठी हा सगळा कट असल्याचा आरोप असदुद्दीन ओवेसी यांनी केला.

असदुद्दीन ओवेसी म्हणाले, "निदा खान हिचा एचआर विभागाशी कोणताही संबंध नव्हता, असे टीसीएसच्या निवेदनात सांगण्यात आले आहे. टीसीएस प्रकरणात 9 एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. त्यातील एका एफआयआरमध्ये निदा खान हिच्यावर धार्मिक भावना दुखावण्याचा आरोप करण्यात आला. एफआयआर होण्यापूर्वीच तिची दुसरीकडे बदली झाली होती. या प्रकरणातील तक्रारदार हा सत्ताधारी राजकीय पक्षाशी संबंधित आहे. सध्या या प्रकरणात कोणतेही निकाल देऊ शकत नाही."

एफआयआरमध्ये निदा खानच्या घरातून बुरखा, नकाब आणि पैगंबर मोहम्मद यांचे पुस्तक जप्त केल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. यावर ओवेसी यांनी संताप व्यक्त केला. ते म्हणाले, "या सगळ्या वस्तू आक्षेपार्ह कधीपासून झाल्या,? कुणी आपल्या धर्माचे पुस्तक बाळगत असेल, तर ते बेकायदेशीर कसे ठरू शकते? केवळ द्वेषापोटी आणि सुशिक्षित मुस्लीम मुलामुलींना त्रास देण्यासाठी हे सर्व प्रयत्न केले जात आहेत."

"दिल्लीत यापूर्वी अशाच प्रकारे मिर्झा गालिब यांचे पुस्तक सापडल्यावरून मुस्लीम तरुणांना दहशतवादी ठरवण्यात आले होते, जे पुढे कोर्टाने फेटाळून लावले. निदा खान प्रकरणातही न्यायालयावर आमचा पूर्ण विश्वास असून तिची निर्दोष मुक्तता होईल," असा विश्वास ओवेसी यांनी व्यक्त केला.

या प्रकरणातील वृत्तांकनावर ओवेसी यांनी कडक शब्दांत ताशेरे ओढले. "काही लोकांकडून या प्रकरणाची मीडिया ट्रायल सुरू आहे. जर मीडियाच न्यायाधीशांचे काम करू लागला, तर ते लोकशाहीसाठी भयावह आहे. जोपर्यंत न्यायालयात आरोप सिद्ध होत नाहीत, तोपर्यंत कुणालाही दोषी ठरवणे चुकीचे आहे. या प्रकरणातील तक्रारदार हा सत्ताधारी राजकीय पक्षाशी संबंधित आहे, हे विसरून चालणार नाही," असेही त्यांनी नमूद केले.

नगरसेवक मतीन पटेल यांच्यावर होत असलेल्या आरोपांबाबत विचारले असता ओवेसी म्हणाले, "तो मुलगा कोर्टात या प्रकरणाचा सामना करेल. त्याला जे काही बोलायचे आहे, ते तो न्यायालयासमोर मांडेल. यात परेशान होण्यासारखे काहीही नाही. कायदा आपले काम करेल."

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १० मे २०२६


## तहसील कार्यालयातील जनरेटर बनले केवळ शोभेची वास्तू





**सिंदखेडराजा (कदीम शेख) :** मातृतीर्थ सिंदखेडराजा तहसील कार्यालयामध्ये दिनांक सहा मे रोजी लाईट नसल्यामुळे दिवसभर तहसील कार्यालयामधील महत्त्वाची कामे ठप्प होती व या बाबत तालुक्यातील बऱ्याच नागरिकांचे कामे जनरेटर असूनही दुरुस्त नसल्याने अधिकाऱ्याचे आरामाचे कारण बनले याबाबत काही जागृत पत्रकारांनी आवाज उठवला लाईट नसल्यामुळे जनरेटर किंवा इन्वर्टर लावून कामकाज करायचे असते परंतु भले मोठे जनरेटर नादुरुस्त असल्यामुळे लाईटवरच कर्मचाऱ्यांना अवलंबून राहावे लागत आहे त्यामुळे दिवसभर नागरिकांच्या कामाचा बट्ट्याबोळ झाला असून कुठले ही काम न झाल्या मुळे लोकांना मानसिक आर्थिक व शारीरिक त्रास सुद्धा सहन करावा लागला, या बाबत भिम शक्ती चे प्रदेश अध्यक्ष, अर्जुन काकडे साहेब यांनी याबाबत जर ०७ दिवसात जनरेटर प्रशासनाने दुरुस्त केले नाही तर आम्ही स्व खर्चातून जनरेटर दुरुस्त करण्यासाठी तहसीलदार यांना वर्गणी देण्यात येईल असे त्यांनी सांगितले जनरेटर मुळे कुठल्याही प्रकारचे कामकाज ठप्प राहता कामा नये अनेक नागरिक मोठ्या अपेक्षा घेऊन तहसील कार्यालयामध्ये येत असतात आणि केवळ लाईट नसल्यामुळे दिवसभर कामकाज ठप्प राहणे हे काही योग्य नाही याबाबत जिल्हाधिकारी त्याचबरोबर महसूलमंत्री यांना सुद्धा परिस्थिती कळवून मंत्रालयात धाव घेण्यात येईल असे सुद्धा त्यांनी सांगितले. मात्र आता जनरेटर स्व खर्चातून दुरुस्त होते की प्रशासन दुरुस्त करते हे पाहणे महत्वाचे असून तालुक्यातील नागरिकांचे लक्ष वेधले आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903



## यशस्वी परंपरेला उजाळा, मराठा हायस्कूलचा दहावीचा निकाल घवघवीत




**छत्रपती संभाजीनगर :** विवेकानंद शिक्षण संस्था संचलित मराठा हायस्कूल चौराहा येथील दहावी परीक्षेचा निकाल यंदाही अत्यंत घवघवीत लागला असून शाळेने आपल्या यशस्वी परंपरेला साजेसा गुणवत्तापूर्ण निकाल प्राप्त केला आहे. शाळेचा एकूण निकाल ८४.४९ % लागला असून विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले आहे. कु. अनुष्का विजय अहुजा हिने ८९ % गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. अंजली अरुण रुपेकर व कु. सचिन संजय शिंदे यांनी प्रत्येकी ८३.६० % गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला, तर कु. रुमेसारहीम शेख हिने ८१.६० % गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला. परीक्षेत १३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले असून ३६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ७० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर ३९ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. एकूण १५८ विद्यार्थ्यांनी यश संपादन करून शाळेच्या गुणवत्तेचा ठसा उमटविला. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री सुहास मडके सर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला. यावेळी सर्व शिक्षकांचेही विशेष कौतुक करण्यात आले. याप्रसंगी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री सुनील भडके सर, श्रीमती संगीता भोसले मॅडम, श्री सुधीर पाटील सर, श्री अच्युत औटे सर, श्री अरुण माने सर तसेच श्री अमित चौधरी सर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच शाळेने ही उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखल्याची अशी भावना शाळेचे मुख्याध्यापक सुहास मडके सर यांनी व्यक्त केली.

## पारदर्शकतेची नवी व्याख्या! इकरा पब्लिक स्कूलचे विद्यार्थी सीसीटीव्हीच्या उपस्थितीतही ठरले 'किंग'




**इकरानगर, जळगाव :** ८ मे २०२६ येथील इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या सेमी इंग्लिश माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून शाळेचा एकूण निकाल ९८.४१ टक्के लागला आहे.यंदाची परीक्षा सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या कडक देखरेखीखाली आणि अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडली असतानाही,इकराच्या विद्यार्थ्यांनी पारदर्शकतेची नवी व्याख्या मांडत आपल्या अभ्यासाच्या जोरावर हे निर्भेळ यश मिळवले.शाळेतून एकूण ६३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यापैकी १ विद्यार्थी गैरहजर राहिला आणि उर्वरित सर्व ६२ विद्यार्थी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले आहेत. गुणवत्तेमध्ये साद शेख युनूस याने ८७ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला, तर काकर दानिश आलम याने ८०.८० टक्के गुणांसह द्वितीय आणि उमेर फिरोज पिंजारी याने ७७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.तसेच मोईज शेख शकील व अन्सारी इसहाक अखलाक ७६ टक्के गुण मिळवून चतुर्थ,तर अफ्फान शेख शकील ७५.८० टक्के गुणांसह पाचव्या क्रमांकावर राहिले आहेत.विशेष म्हणजे, यंदा शाळेतील खेळाडू विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमानुसार स्पोर्ट्स कोटामधून ५ ते ६ वाढीव गुणांचा विशेष लाभ मिळाला आहे.

विद्यार्थ्यांच्या या देदिप्यमान यशाबद्दल शाळेचे चेअरमन डॉ.अब्दुल करीम सालार,एजाज मलिक व समस्त संस्था सदस्यांनी शाळेचे प्राचार्य, शिक्षक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे विशेष कौतुक केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १० मे २०२६


## अंबाजोगाईला ५०० बंदी क्षमतेचे जिल्हा कारागृह; राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध




**अंबाजोगाई (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे नवीन 'जिल्हा कारागृह वर्ग-१' स्थापन करण्यास अधिकृत मंजुरी दिली आहे. बीड येथील एकमेव जिल्हा कारागृहावर वाढलेला ताण कमी करण्यासाठी आणि पोलीस प्रशासनाच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी या कारागृहाच्या मंजुरीसाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता, ज्याला आता यश आले असून ५ मे २०२६ रोजी यासंदर्भातील अधिसूचना राज्य राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे.महाराष्ट्र कारागृह आणि सुधारसेवा अधिनियम २०२५ च्या कलम ३ आणि ४ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून राज्य सरकारने हे नवीन कारागृह घोषित केले आहे. अंबाजोगाई तालुक्यातील मौजे काळवंटी, लमाण तांडा येथील सर्व्हे क्रमांक १/अ/५ मधील सुमारे ३० एकर क्षेत्रावर हे भव्य कारागृह साकारले जाणार आहे. या कारागृहाची एकूण क्षमता ५०० कैदी इतकी निश्चित करण्यात आली असून, यामुळे जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाला होणारा त्रास कमी होणार आहे. विशेषतः आरोपींना सुनावणीसाठी ने-आण करताना होणारी ओढाताण या निर्णयामुळे थांबणार आहे.या नवीन कारागृहाच्या सीमा देखील निश्चित करण्यात आल्या असून, उत्तरेस व दक्षिणेस गायरान जमीन, पूर्वेस रस्ता आणि पश्चिमेस सर्व्हे क्रमांक १० अशी याची व्याप्ती असेल. राज्यपाल यांच्या आदेशानुसार सहसचिव सुग्रिव धपाटे यांनी या निर्णयाची घोषणा केली आहे. आमदार नमिता मुंदडा यांनी या कारागृहासाठी आवश्यक असलेल्या ३० एकर जागेची उपलब्धता आणि प्रशासकीय मंजुरी मिळवण्यासाठी विशेष परिश्रम घेतले होते.

या निर्णयामुळे अंबाजोगाई परिसरातील पोलीस प्रशासनाच्या सोयीसह जिल्ह्याच्या कारागृह व्यवस्थेत मोठी सुधारणा होणार आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

## ग्रामविकास संस्थेचे नरहरी शिवपुरेयांचा सुखना जनआंदोलन समितीतर्फे सत्कार



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** ग्रामविकास संस्थेचे सचिव नरहरी शिवपुरे यांना सुखना नदीची उपनदी असलेली चित्ते नदी पुनरुज्जीवन कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा जलपुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा आज जलमंथन या विशेष कार्यक्रमात सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. ग्रामविकास संस्था ही महिला सबलीकरण, पाणी प्रशी, शेतकरी व ग्रामविकास, आदी क्षेत्रात काम करणारी स्वयंसेवी संस्था आहे. या संस्थेच्या वतीने आतापर्यंत विविध समाजोपयोगी प्रकल्प राबविण्यात आले आहे. त्यांच्या या कार्यांची दखल घेऊन त्यांचा विशेष सत्कार समितीचे संस्थापक डॉ. शिवाजी हुसे यांच्या हस्ते करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे समितीचे अध्यक्ष अशोकराव काळे , उपाध्यक्ष भाऊसाहेब घुगे, सचिव डॉ. बाळासाहेब बेळगे, कार्याध्यक्ष शिवाजीराव दांडगे, सहसचिव सुरेश जुए पाटील, सोपान कोळकर, बळिराम काळे, विशाल हुसे, प्रा. संदीप हुसे, बाबासाहेब पठाडे, अनिल वावरे लहू तुपे, आदिंनी अभिनंदन केले. यावेळी प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, सर्जेराव वाघ, शिवाजीराव घुगे, राठोड, साहेब, हिरे साहेब आणि मान्यवर. यांची उपस्थिती होती.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## मोबाईलच्या आभासी दुनियेतून बाहेर काढत विद्यार्थ्यांना दिला शिवकालीन युद्धकलेचा वारसा - शैलेश लाहोटी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** आजच्या डिजिटल युगात मोबाईल, कॉम्प्युटर आणि टीव्हीच्या आभासी दुनियेत अडकलेल्या मुलांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्श कार्याची प्रेरणा देत त्यांचे शारीरिक व मानसिक मनोबल वाढविण्यासाठी प्राचीन युद्धकला प्रशिक्षण शिबिरासारखे उपक्रम राबविने काळाची गरज असल्याचे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले.जवाहर विद्यालय,जिंतूर येथे दिनांक ७ मे रोजी आयोजित प्राचीन युद्धकला प्रशिक्षण शिबिराच्या समारोप कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्ट,जिंतूर यांच्या वतीने आयोजित या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना शिवकालीन युद्धकलेचे प्रशिक्षण देण्यात आले.यामध्ये लाठी काठी,तलवारबाजी,भाला, दांडपट्टा यांचे प्रशिक्षण देण्यात आले होते कार्यक्रमास यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य बळीराम वटाणे, नायब तहसीलदार प्रशांत राखे, संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष अभिजित देशमुख,संतोष काकडे प्रशिक्षक शुभम गडकरी व अभिषेक पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी पुढे बोलताना सांगितले की, “छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य, शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा ही आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. मुलांनी मोबाईलच्या आहारी न जाता इतिहासातून प्रेरणा घेत स्वतःला सक्षम बनवणे आवश्यक आहे. अशा शिबिरांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि देशभक्तीची भावना निर्माण होते.तर मुलींसाठी असल्या प्रशिक्षणाची खरी गरज आहे" दरम्यान प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे कोल्हापूर येथून आलेल्या प्रशिक्षकांनी सादर केलेले प्राचीन युद्धकलेचे थरारक प्रात्यक्षिक होय. दांडपट्टा,तलवारबाजी व विविध युद्धकौशल्यांचे सादरीकरण पाहताना उपस्थितांचा श्वास रोखला गेला.

या चित्तथरारक प्रात्यक्षिकांना पालक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काजळे, सोपान धापसे,संजय काळे,शरद ठोंबरे, संतोष शिंदे, विशाल शिंदे, लक्ष्मण कवडे, रवींद्र प्रधान यांनी प्रयत्न केले.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १० मे २०२६


## उंदीरमामाचे स्वप्न

एकदा उंदीरमामाला
छान स्वप्न पडले
स्वप्नात मनीमाऊशी
मैत्रीचे नाते जडले

उंदीरमामाला मनीमाऊची
वाटत नव्हती भीती
हातात हात घालून
मैत्रीचे गीत गाती

दोघेही जेवण करायचे
एकाच ताटात
लपंडाव खेळीत
राहायचे थाटात

खेळतांना उंदीरमामा
पाय घसरून पडले
झोपमोड झाल्याने
अचानक जागी झाले

समोरच दिसली त्यांना
एक भलीमोठी मनीमाऊ
बिळाच्या दिशेने
उंदीरमामा लागले धावू




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## सातबारा करा कोरा

साऱ्या जगाचा पोशिंदा,
माझा शेतकरी राजा.
सातबारा करा कोरा!
नका करू गाजावाजा. १

खूप त्रास होतो देवा,
किती सहन करावे.
कधी येणार मदत,
काय असेच मरावे. २

करू नका भांडवल,
पोट भरण्यास तुम्ही.
नाही राहिलो रे खुळे,
डाव ओळखतो आम्ही. ३

खूप झाले रे भाषण,
दिल्या वचनास जाग.
पूर्ण करा आश्वासन,
लावू बुडाखाली आग. ४

सोडणार नाही आता,
त्रास देणाऱ्यास पुन्हा.
शांत बसतो म्हणून,
करू नये कोणी गुन्हा. ५


रोज कसतांना शेती,
ओढाताण होते फार.
सातबारा करा कोरा
डोईवर झाले भार. ६




नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर


# वासनांध मानसिकतेचा गिधाडी डि.एन.ए. माणसातल्या सैतानात उतरलाय!

**स्त्री**दास्य, स्त्रीपिडिताचा इतिहास वर्षोनुवर्षे चालत आलेला आहे. कर्मकांडी परंपरेने स्त्री शोषणाला समाज व राजमान्यता प्रदान केल्याची इतिहासात सोदाहरण नोंद हेच दृगोचर करते. राजेशाही राजवटीत बहुपत्नीत्व असलेला राजा सम्राटत्व , शौर्य, अधोरेखित करीत असे. मनुवादी स्त्रीपिडनाचा, धर्माभिमानी मानसिकतेचा बुरखा फाडून डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती चे सार्वजनिक दहन केले. परंपरेच्या चिखलामध्ये महिलांना दुय्यम व नीचांकी ठरविणारा स्त्रिदास्याच्या भयावह , तितकाच माणूसकीला काळीमा फासणारा खरा चेहरा समाजापुढे आणला . महर्षी कर्वे, राजाराम मोहन रॉय आदी समाजधुरीणांनीही या अनुषंगाने तीव्र लढा उभारला होता.आज स्वातंत्र्याच्या वयाचा हिशोब मांडताना स्त्री समानता, स्त्रीमुक्ती या अनुषंगाने कौटुंबिक, सामाजिक, राजकीय ,सांस्कृतिक धार्मिक आणि आर्थिक स्वातंत्र्याचा लेखाजोखा मांडला जाणे उचीत होईल.. महिला म्हणून होत असलेल्या लैंगिक शोषणात दिवसेंदिवस होणारी वाढ , मानसिक स्वरूपातील अत्याचाराची भीषणता "माणूस" म्हणून सून्न करणारी आहे. जंगली प्राण्यांचा एक नैतिक शिरस्ता असतो . तो आजही अबाधित राहिला आहे. कालोघात होणार्या सामाजिक स्थित्यंतरातील साधनसामग्री, मानवी जीवनात सूखलोलूप प्रगतीची उंचावत जाणारी मृगजळीन दृष्टी. आदीम माणसाला लाजविणारी लैंगिक समानतेच्या नावाआड धुडगूस घालणारी रानटी भोगविलासता यासर्व घटकांचा अतिशय गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. मिडियावरील दैनिक १००बातम्यात १० बातम्या महिला बलात्कार, अत्याचार अपहरणाच्या असतातआज स्त्री कुठल्याच क्षेत्रात ,शाळा, कॉलेज, कार्यालय, इस्पितळ , कुठल्याही पदावर आणि सर्वात बोचणारी गोष्ट म्हणजे कोणत्याही नात्यात स्त्री सुरक्षित राहिली नाही. हैदराबाद येथील सुमती नावाची आय .पी. एस . अधिकारी एक सामान्य महिला म्हणून समाजापुढे उभी राहते तेव्हा विविध क्षेत्रातील, वयातील, ४० पुरुष तिच्या कडे सार्वजनिक ठिकाणी जगजाहीरपणे शैय्यासोबत करण्यासाठी रेट विचारतात, थेट येतेस कां? असा प्रश्न विचारून विनयभंग करतात. मध्यरात्री उफाळून आलेले पौरुषत्व भाजीपाल्याचा भाव करावा तसा बाईच्या देहाची बारगेनिंग करतात , तिच्या बाईपणावर, देहावर, कौमार्यावर ४० गिधाडे अक्षरशः तुटून पडतात हे विदारक वास्तव आहे., एका महिला पोलीस अधिकारार्याने अनुभवलेले! कौटुंबिक हिंसाचाराची, घटस्फोटाची हजारो प्रकरणे कोर्टात धुळखात पडलेली आहेत. सद्यस्थितीत पशूरूपी लैंगिक मानसिकता उफाळून आली आहे भरचौकात, शाळेत, कार्यालयात, दवाखान्यात, सार्वजनिक उत्सवातून सर्वसाक्षी होत असलेली विटंबना चिमुरड्यांपर्यंत येऊन ठेपली आहे. मालेगावात विजय खैरनार नावाचा राक्षस नातीवर अतिप्रसंग करतो, भीमराव कांबळे चिमुकलीच्या तोंडात मोजे कोंबून अत्याचार करतो, १६ वर्षीय महिलेवर पतीच्या संमतीने सावत्र मुलगा बलात्कार करतो, भंडारा शासकीय रुग्णालयात ६० वर्षीय वृद्धाचा विनयभंग केला जातो, हवेली तालुक्यात दोन नराधम चिमुकल्या मुलींवर बलात्कार करतात .. ........सर्व घटना माणूस म्हणून बधीर करणार्या आहेत. बलात्कारी नराधमाचा भरचौकात चौरंग करणार्या छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र कुठे आहे? साधूसंत, महानुभाव यांनी पावन केलेला पुरोगामी महाराष्ट्र कुठे आहे? राज्यात महिला अत्याचार, अपहरण, गँगवार, टोळीयुद्ध, गल्ली बोळात धुडगूस घालणारी कोयता गंग, एकंदरीत झुंडशाहीचा आलेख उंचावत चालला आहे, संपूर्ण महाराष्ट्र हिंसक घटनांच्या सावटाखाली चाचपडत आहे. खून, दरोडा, महिला अत्याचार, सांघिक कांडा सारख्या गुन्हेगारीवर गृह खात्याचा वचक राहिलेला नाही राज्यात दररोज सरासरी २७ चिमुकली पावलं शाळेत, बागेत न पडता वासनांध कौर्याने कायमची छाटली जाताहेत. गेल्या चार महिन्यांत ३२०९ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत, वर्षभरातील ही संख्या १३हजार ४१० इतकी आहे. ही आकडेवारी देशाला सून्न करणारी आहे अगणिक पिडिता, त्यांचे नातेवाईक न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत राजकीय कृपाछत्राखाली असे गुन्हे वाढले आहेत कां? असा दबक्या आवाजात जनतेचा सूर उमटू लागला आहे. महिलांचे अद्ययावत शोषण करणाऱ्या खरात सारख्या भोंदू बाबांची संख्या अचानक वाढते आहे .रोज नवीन भोंदू बाबा गजाआड होत आहे ही अपराधाची जलदगती फास्ट ट्रॅक कोर्ट कां दाखवत नाही ? जलदगती न्यायालयाने आजपर्यंत किती प्रकरणे निकाली काढली, किती पिडितांना न्याय दिला, याची माहिती कुठेच मिळत नाही. अन्याय अत्याचार, बलात्कार, झुंजशाही रोखण्यासाठी कुठली जलद यंत्रणा आहे? बाहुबली गृहमंत्रालय बाहुबली राजकारणाची कळपुतली बाहुली बनले आहे कां? असे अनेक प्रश्न सामान्य जनतेला पडले आहेत "लेडी सूपरकाॅप" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निवृत्त महिला पोलीस अधिकारी मीरा बोरवणकर यांची महिला आयोगाच्या अध्यक्षपदी वर्णी लागली आहे, एक आशा पल्लवित झाली आहे . महाराष्ट्रातील महिला शोषणाचा चढता आलेख रोखण्यात अध्यक्षा यशस्वी होतील कां? का त्यांनाही राजकीय हस्तक्षेपामुळे हतबल व्हावे लागले हे येणारा काळच ठरवेल. माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या पुरोगामी आश्वासक प्रतिमेला तडा गेला आहे, त्याच आरोपिच्या पिंजऱ्यात उभ्या आहेत. वासनांध गिधाडी मानसिकता जोपासणारा, माणसातला सैतान संतांच्या पावन भूमीत पोसला जातोय! "पोशिंदा कोण?" हा प्रश्न जनमानस अस्वस्थ करणारा नक्कीच आहे.




साहेबराव मोरे
विद्रोही कवी, ज्येष्ठ समीक्षक
चाळीसगाव ९४०४०४८६०१






बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002